भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०१/२०१७

**१) निष्काळजीपने वाहन चालवुन इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २७/०१/२०१७ रोजी चे १३.३० वा. दर. यातिल फिर्यादी कुष्णा हिवराज फंदे वय ३५ वर्ष रा.मोहघाटा हा आपले मोटार सायकल क्र. एमएच ३६/२२१४ ने बांम्पेवाडा कडे जात असतांना मागेहुन येणा—या यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, निष्काळजीपने , भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन मागेहुन धडक मारल्याने फिर्यादीची मोटार सायकल खाली पडुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७, भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. गोडंगे पो. स्टे. साकोली हे करीत आहे.

**२) संगनमत करून जादुटोन्याच्या कारणावरून शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २९.१.२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी याचे १०ते १५ वर्षापासुन बोलचाल बंद आहे ते नेहमी शिवीगाळ करून जादुखोर आहेस असे म्हणतात तसेच फिर्यादी हि आपले घरी हजर असतांना यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून घरासमोर येवुन फिर्यादीस तु जादुखोर आहेस जादुटोना करते त्यामुळे माझ्या मुलीची प्रकुती खराब झाली आहे असे म्हणुन शिवीगाळ करून मारण्यास धावुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली यांनी कलम ३,२(१) (ख),६ महाराष्ट्र जादुटोना प्रतिबंधक कायदा २०१३ सहकलम ५०४,५०६,३४ भादवी.अन्वये पोलीस स्टेशन साकोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) ट्रकची मोटार सायकलला धडक मारून दोन जखमी झाल्याने गुन्हा नोंद:—**

दिंनाक २९/०१/२०१७ रोजी चे २१.२२ वा. दर. यातील फिर्यादी रजतकुमार राजेश ढोके वय २१ वर्ष रा. कामगार नगर कामंठी यांचे वडील राजेश चैतराम ढोके व बहीन कु. वर्षा ढोके वय १९ वर्ष हे मोटार सायकल क्र. एमएच ४० डब्ल्यु ०१९१ ने भांडण वरून नागपुर कडे जात असतांनी भारत पेट्रोपंप येथे पेट्रोल भरून जात असतांनी यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपने ,लापवाहीने चालवुन मोटार सायकलला धडक मारून फिर्यादीचे वडील व बहीन खाली पडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७, भादवी.सहकलम १३४,१८४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहे.

**४) अवैध जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक २९/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हे दाखल करून जुगारातुन ८७०/—रू माल जप्त करण्यात आला आहे.

**५) मोटार वाहन कायदया खाली कारवाई. :—**

दिनांक २९/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ९८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२ केसेस, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.